भुसावळ बदली प्रकल्पामध्ये मागणी क्र. के-११,
मुख्य लेखाशिर्ष ४८०१३७३१ करिता पुर्नविनियोजनाने
रक्कम उपलब्ध करुन देणेबाबत...सन २०१७-१८

महाराष्ट्र शासन
ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र.पुरमा-२०१७/प्र.क.१५६/ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : ३१ मार्च, २०१८

संदर्भ :- १. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. प्रकल्प-२०१०/प्र.क्र.३/उर्जा-४, दि. ०५.१०.२०१०
२. महानिर्मितीचे पत्र क्र.CMD/MSPGCL/No. ०१२८२ दि.०२.०२.२०१८

प्रस्तावना :-

भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्प महानिर्मिती कंपनीने हाती घेण्याचे ठरविले आहे. महानिर्मिती कंपनीने शासनास सादर केलेल्या प्रस्तावास शासनाने संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये मान्यता दिली आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने भुसावळ औष्णिक बदली प्रकल्पाच्या रु. ४२९० कोटी पैकी शासनाचे २०% भागभांडवल रु. ८५८ कोटी इतके मंजूर केले आहे त्यापैकी आजतागायत रु. ६.३५ कोटी भागभांडवल महानिर्मिती कंपनीस वितरीत करण्यात आले होते.

२. भुसावळ (१X६६० मे.वॅ.) हा प्रकल्प महानिर्मिती कंपनीने हाती घेतला आहे त्यास संदर्भ-१ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या EPC कंत्राटापोटी अग्रीम रक्कम रु. १८५ कोटी सन २०१७-१८ मध्ये महानिर्मिती कंपनी भेल कंपनीस देण्याचे प्रस्तावित आहे त्या खर्चाच्या २०% भागभांडवलापोटी रु. ३७ कोटी पुर्नविनियोजनाने उपलब्ध करुन देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :-

भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्प महानिर्मिती कंपनीने हाती घेतला असल्यामुळे संदर्भिय क्र.१ शासन निर्णयान्वये सदर प्रकल्पास शासनाने मान्यता दिली आहे. भुसावळ (१X६६० मे.वॅ.) हा प्रकल्प महानिर्मिती कंपनीने हाती घेतला असल्यामुळे या प्रकल्पाच्या EPC कंत्राटापोटी अग्रीम रक्कम रु. १८५ कोटी सन २०१७-१८ मध्ये महानिर्मिती कंपनी भेल या कंपनीस देणार आहे त्या खर्चाच्या भागभांडवलापोटी शासनाची २०% भांडवली गुंतवणूक रु. ३७ कोटी पुर्नविनियोजनाने खालीलप्रमाणे वितरीत करण्यास शासन मंजुरी देण्यात येत आहे.

(रु.कोटीत)

अनु.क्र.	मुख्यलेखाशिर्ष	सन २०१७-१८ ची मंजूर तरतूद	पुर्नविनियोजनाची रक्कम	पुर्नविनियोजना नंतरची सन २०१७-१८ ची तरतूद
१	२	३	४	५ (३-४)
(घट करावयाचे उप शिर्ष) १	मागणी क्र. के-११ मुख्य लेखाशिर्ष ४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च, ०२ औष्णिक विद्युत निर्मिती, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, पंचवार्षिक योजना, राज्य योजना (००) (०५) सौर वीज प्रकल्पामध्ये भांडवली गुंतवणूक (४८०१४०१२), ५४ गुंतवणूक	४२५.००	(-) ३७.००	३८८.००
वाढ करावयाचे उपशिर्ष २	मागणी क्र. के-११ मुख्य लेखाशिर्ष ४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च, ०२ औष्णिक विद्युत निर्मिती, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, पंचवार्षिक योजना, राज्य योजना (००) (०३) भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या बदली प्रकल्पामध्ये भांडवली गुंतवणूक (४८०१३७३१), ५४ गुंतवणूक	०.०००१	(+) ३७.००	३७.०००१

३. सदर भुसावळ प्रकल्पाकरिता मागणी क्र. के-११ मुख्य लेखाशिर्ष ४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०२ औष्णिक विद्युत निर्मिती, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, पंचवार्षिक योजना, राज्य योजना (००) (०५) सौर वीज प्रकल्पामध्ये भांडवली गुंतवणूक (४८०१४०१२), ५४ गुंतवणूक या लेखाशिर्षामधून मागणी क्र. के-११ मुख्य लेखाशिर्ष ४८०१ वीज प्रकल्पावरील भांडवली खर्च ०२ औष्णिक विद्युत निर्मिती, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, पंचवार्षिक योजना, राज्य योजना (००) (०३) भुसावळ औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या बदली प्रकल्पामध्ये भांडवली गुंतवणूक (४८०१३७३१), ५४ गुंतवणूक या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजनाने रु. ३७ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम भाग-२, दि. १७.०४.२०१५ चे परिशिष्ट वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उप विभाग ३ अनु. क्र. १ परिच्छेद-१६२,१६३ व १६४ या मधील अट क्र. ९ मधील तरतूदीच्या अनुषंगाने व नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. २९/१४६१, दि. ०२.०२.२०१८ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. १३३/अर्थ-१४, दि. १५.०२.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८०३३१२१००५७९८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Maroti Atram

Digitally signed by Ashok Maroti Atram
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e212845163abd708717bb4bef92b6886b147679a5af5a494e268689ab8d696dd, serialNumber=5f7eca1f400d866ea34324cea1a547aa04f0da0794a00bee126e8678172a15c5, cn=Ashok Maroti Atram
Date: 2018.03.31 21:01:13 +05'30'

(अशोक आत्राम)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी मर्यादित, हाँगकाँग बँक बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.
२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१
३) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद / विधानसभा, विधान भवन, मुंबई
४) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
५) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
७) अधिदान व लेखा अधिकारी, अराप / रालेवि-१), मुंबई.
८) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
९) निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
१०) विशेष कार्य अधिकारी (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
११) क.अ.अधिकारी (प्रशा-१), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१४ / साधनसंपत्ती / साऊ / व्यय-१६) मंत्रालय, मुंबई-३२.
१३) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४) उप सचिव (ज.वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी अग्रषित
१५) मुख्य अभियंता (विद्युत) जल विद्युत प्रकल्प यांचे कार्यालय, एच. एस. बी. सी. इमारत, चौथा मजला, एम.जी. रोड, फोर्ट, मुंबई ४००० ०१
१६) निवडनस्ती (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२